RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - २ रे | अंक -१६५ वा | अमरावती (महाराष्ट्र) | गुरुवार दि.२५ जुलै २०२४ | संपादक - शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -६

## विधानसभेच्या २२५ ते २५० जागा स्वबळावर लढणार

### मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची पदाधिकारी मेळाव्यात घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतल्या पदाधिकारी मेळाव्यात स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. आज त्यांनी जो पदाधिकारी मेळावा घेतला तो याचसाठी घेतल्याचीही माहिती त्यांनी यावेळी दिली. युती करायची का? कुणाबरोबर जायचं हे सगळं आपण नंतर ठरवू. मनसेची सत्ता आली पाहिजे यासाठी आपण २२५ ते २५० जागा लढवायच्या आहेत असं राज ठाकरेंनी जाहीर केलं. लोकसभेला राज ठाकरेंनी मोदींना बिनशर्त पाठिंबा दिला होता. मात्र आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी वेगळी भूमिका घेतली आहे.

**काय म्हणाले राज ठाकरे?**

विधानसभा निवडणूक ही अत्यंत चुरशीची आणि घमासान असलेली होणार आहे. या निवडणुकीत मला आपले आमदार निवडून आलेले पाहिजेत म्हणजे पाहिजेतच. काय घडतं आहे, काय घडू शकतं? याचं आकलन करा. मी तुम्हाला खरं सांगतो निवडून येण्याची क्षमता असलेल्यांनाच तिकिट मिळेल. तिकिट मिळालं की मी पैसे काढायला मोकळा असल्या कुणालाही तिकिट दिलं जाणार नाही. तुम्ही जे बोलाल जे सांगाल जे तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांनी नीट माहिती द्या. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत मनसेचे पदाधिकारी आणि आपले लोक सत्तेत बसावयचे आहेत. अनेक लोक हसतील हसुदेत काही प्रश्न नाही. मात्र हे घडणार म्हणजे घडणार. असंही यांनी म्हटलं आहे.



**विधानसभेला २२५ ते २५० जागा मनसे लढवणार**

युती होईल का? कोणत्या जागा मिळतील? असला कुठलाही विचार मनात कुणीही आणू नका. आपण जवळपास २२५ ते २५० जागा लढवणार आहोत. तसंच आज कुणी कितीही मोठ्याने घोषणा दिल्या तरीही तिकिट पक्कं असं समजू नका. कुणी कुठल्याही भ्रमात राहू नका. तसंच मला काही जणांनी सांगितलं की आपला पक्ष काहींना सोडायचा आहे. त्यांना मी रेड कार्पेट घालून देतो, त्यांनी खुशाल पक्ष सोडून जावं. १ ऑगस्टपासून मी महाराष्ट्राचा दौरा सुरु करतो आहे. जिल्हा, तालुक्यात येईन तेव्हा मी तुम्हाला भेटेनेच. मेळावे घ्यायचे की नाही ते नंतर पाहू. मात्र पदाधिकाऱ्यांच्या बैठका नक्की होतील. असंही राज ठाकरेंनी सांगितलं.

**लाडका भाऊ आणि बहीण योजनेवरुन टीका**

मूळ गोष्टींकडे म्हणजे पाणी, नोकरी, आरोग्य याकडे कुणाला लक्ष द्यायला वेळ नाही. आपल्याकडे काय आहे? लाडकी बहीण आणि लाडका भाऊ. अहो लाडकी बहीण आणि लाडका भाऊ दोन्ही पक्ष एकत्र राहिले असते तर दोन्ही पक्ष टिकले असते. त्यासाठी योजना कशा पाहिजेत? बहिणीला १५०० रुपये देणार, भावाला इतके देणार. राज्य सरकारकडे पैसे आहेत का? रस्त्यावरचे खड्डे बुजवायला पैसे नाहीत. मूळ प्रश्नांकडे लक्ष देणं गरजेचं आहे. हेच महाराष्ट्र विधानसभेसाठी तुमचं कँपेन असलं पाहिजे. एकमेकांना शिव्या द्यायच्या लोकांची दिशाभूल करायची आणि निवडणूक लढवायची यातून काही हाताला लागत नाही असंही राज ठाकरे म्हणाले.

## केजरीवालांना दिलासा नाहीच

### न्यायालयीन कोठडी ८ ऑगस्टपर्यंत वाढ

**तिहार कारागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यातील सीबीआय प्रकरणात राऊस एव्हेन्यू कोर्टाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ८ ऑगस्टपर्यंत वाढ करण्यात आली आहे. आज तिहार कारागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी झाली.



याआधी १२ जुलै रोजी सीबीआयमार्फत तपास करत असलेल्या अबकारी धोरणाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात न्यायालयाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत शुक्रवारी २५ जुलैपर्यंत वाढ केली होती.

केजरीवाल यांनी केंद्रीय अन्वेषण विभागा (सीबीआय) ने केलेल्या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील निकाल दिल्ली उच्च न्यायालयाने १७ जुलै रोजी राखून ठेवला आहे. केजरीवाल यांनी त्यांची अटक बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. संपूर्ण पुरावे उपलब्ध झाल्यानंतरच कायद्यानुसार अटक करण्यात आल्याचा दावा सीबीआयने केला आहे. न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांनीही केजरीवाल यांच्या अंतरिम जामीन याचिकेवरील निर्णय राखून ठेवला आहे.

## खडकवासलानंतर आता मुळशी धरणातूनही सोडणार पाणी, पुणेकरांसाठी सतर्कतेचा इशारा

**पुणे शहर आणि जिल्ह्याला रेड अलर्ट ; शाळांना सुटी जाहीर**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ पुणे**

राज्यातील विविध भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली असून मुंबई पुण्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. पुणे शहर आणि जिल्ह्याच्या परिसरात पावसाचा जोर वाढला असल्याने जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी पुणे शहर आणि जिल्ह्यातील शाळांना सुटी जाहीर केली आहे. हवामान विभागाने येत्या काही तासात पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला असल्याने (रेड अलर्ट) या भागातील शाळा २५ जुलै रोजी बंद ठेवव्यात, आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.सुहास दिवसे यांनी दिले आहेत. तर, आता सायंकाळी पाच वाजता मुळशी धरणातून ५ ते ७ हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात आली आहे.



तर, दुसरीकडे मुंबईतही पावसाने चांगलाच जोर धरला असून मुंबई लोकल विस्कळीत झाली आहे. परिणामी कामाशिवाय बाहेर न पडण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे रायगड आणि ठाणे जिल्ह्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पाणी पातळीत गुरुवारी मोठी वाढ झाली. गुरुवारी सकाळी साडेसातच्या सुमारास बदलापुरातून उल्हास नदी इशारा पातळीवरून वाहत होती. बदलापुरात १६.५० मीटर ही इशारा पातळी आहे. तर १७.५० मीटर ही धोका पातळी आहे.

## राष्ट्रपती भवनातील 'दरबार' आणि 'अशोक' हॉलची नावे बदलली

**राष्ट्रपती भवनाद्वारे निवेदन जारी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

राष्ट्रपती भवनातील दोन महत्त्वाच्या सभागृहांची नावं बदलण्याचा मोठा निर्णय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी घेतला आहे. त्यानुसार 'दरबार हॉल' आणि 'अशोक हॉल' या दोन सभागृहांची नावं बदलण्यात आली आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आता राष्ट्रपती भवनातील 'दरबार हॉल'चं नाव 'गणतंत्र मंडप' आणि 'अशोका हॉल'चं नाव 'अशोक मंडप' असं केलं आहे. यासंदर्भात राष्ट्रपती भवनाद्वारे एक निवेदन जारी करण्यात आलं आहे.



**दोन्ही सभागृहांची खाशियत जाणून घ्या...**

**अशोक हॉल (अशोक मंडप)** - अशोक हॉल जो आता अशोक मंडप म्हणून ओळखला जाईल. राष्ट्रपती भवनाच्या अधिकृत वेबसाइटनुसार, या मंडपची खाशियत म्हणजे मोठं कलाकुसर असलेलं सभागृह असून आता महत्त्वाच्या समारंभासाठी आणि परदेशी प्रमुखांच्या ओळखपत्रांच्या सादरीकरणासाठी वापरलं जातं, जे पूर्वी स्टेट बॉल रूमसाठी वापरलं जात होतं. या अशोक मंडपचे छत तैलचित्रांनी सजलेलं आहे.

**दरबार हॉल (गणतंत्र मंडप)** - राष्ट्रपती भवनातील सर्वात भव्य सभागृह म्हणजे दरबार हॉल, ज्याला आता गणतंत्र मंडप असं नाव देण्यात आलं आहे. दरबार हॉल पूर्वी सिंहासन कक्ष म्हणून ओळखला जात होता आणि याठिकाणी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारनं १५ ऑगस्ट १९४७ रोजी शपथ घेतली होती. १९४८मध्ये सी. राजगोपालाचारी यांनी दरबार हॉलमध्ये भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून शपथ घेतली. तसंच या ठिकाणी राष्ट्रपतींच्या हस्ते नागरी आणि लष्करी सन्मान दिला जातो. याशिवाय, दरबार हॉलमध्येच नवीन सरकारचा शपथविधी सोहळा पार पडतो.

## पूजा खेडकर वादानंतर UPSC चा मोठा निर्णय, परीक्षा पद्धतीत होऊ शकतो बदल

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२५मुंबई**

वादग्रस्त ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर यांच्या प्रकरणामुळे संघ लोकसेवा आयोग चर्चेत आले आहे. विरोधक युपीएससीवर सातत्याने टीका करत आहेत. त्यामुळेच आता आयोग आपल्या परीक्षा पद्धतीत बदल करण्याच्या तयारीत आहे. आयोग आपल्या परीक्षेवेळी नवीन डिजिटल तंत्रज्ञान वापरण्याच्या तयारीत आहे. यामध्ये आधारित फिंगरप्रिंट तपासणी आणि फेस रिकगनीशन तंत्रज्ञान आणणार आहे.

पूजा खेडकर यांनी बनावट कागदपत्र सादर करुन परीक्षा दिल्याचा आणि नोकरी मिळवल्याचा आरोप आहे. त्यामुळे विरोधकांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत, सर्वजण ला दोष देत आहेत. आयोगाच्या परीक्षा आणि निवड प्रक्रियेत गडबड असल्याची टीका सातत्याने होत आहे. आता हाच सर्व प्रकार थांबवण्यासाठी यूपीएससी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेणार आहे. दरवर्षी १४ परीक्षा घेते, ज्यात नागरी सेवा परीक्षेचाही समावेश आहे. या सर्व परीक्षांमध्ये नवीन तंत्रज्ञान वापरले जाऊ शकते.



मीडिया रिपोर्ट्सनुसार, यूपीएससी आधार कार्ड आधारित फिंगरप्रिंट, सीसीटीव्ही कॅमेरे, ई-डमिट कार्ड/क्यूआर कोड स्कॅनिंग अशा तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा विचार करत आहे. परीक्षेत उमेदवाराच्या जागी दुसरे कोणी बसवण्यासारखी फसवणूक टाळण्यासाठी आयोग हे पाऊल उचलू शकतो. यासाठी यूपीएससी ने विविध कंपन्यांकडून निविदा मागवल्या आहेत. त्यामुळे आगामी परीक्षांमध्ये या सर्व तंत्रज्ञानाचा वापर होण्याची शक्यता आहे.

## शिवसेना ठाकरे गटाच्या २४ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नाशिक :**

नाशिकमध्येशिवसेना ठाकरे गटाच्या २४ प्रमुख पदाधिकाऱ्यांसह अन्य कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इगतपुरी तालुक्यातील घोटी टोलनाक्यावर आंदोलन केल्याप्रकरणी घोटी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामधील काही कार्यकर्त्यांना अटक सुद्धा होण्याची शक्यता आहे. घोटी टोलनाक्यावर आंदोलन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी आमदार निर्मला गावित यांच्यासह अन्य पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांचा समावेश आहे. दरम्यान, नाशिक-मुंबई महामार्गावरील खड्ड्यांची समस्या दूर होत नाही, तोपर्यंत टोल वसुली बंद करावी, या मागणीसाठी मंगळवारी शिवसेना ठाकरे गटातर्फे घोटी टोलनाक्यावर आंदोलन करण्यात आले होते. महामार्ग खड्डेमुक्त होत नाही, तोपर्यंत टोल घेऊ नका अशी मागणी करत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी तब्बल एक तास घोटी टोलनाका बंद पाडला होता. या आंदोलनामुळे नाशिक-मुंबई महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

## भरधाव शिवशाहीला आग, ४४ प्रवासी थोडक्यात बचावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अकोला**

शेगाव येथून अकोल्याकडे येत असलेली भरधाव शिवशाहीने अचानक पेट घेतल्याची घटना गुरुवार (२५ जुलै) रोजी दुपारी १ वाजताचे सुमारास रिधोरा नजीक घडली. चालकाने प्रसंगावधान दाखविल्याने बसमधील ४४ प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले. बस मात्र पूर्णपणे जळून खाक झाली.



अकोला क्र. २ आगारातीच एमएच ०९ इएम १७९२ क्रमांकाची शिवशाही बस सकाळी अकोला येथून शेगावकडे गेली होती. विनावाहक असलेली शिवशाही बस चालक पी. एन. डोंगरे शेगाव येथून परत घेऊन येत असताना रिधोरानजीकच्या हॉटेल तुषार समोर आली असता तांत्रिक कारणामुळे चालकाच्या कॅबीनमध्ये अचानक आग लागली.

आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान दाखवत बस थांबविली व सर्व प्रवाशांना धीर देत खाली उतरण्यास सांगितले. तोपर्यंत चालक डोंगरे यांनी अग्निशामक यंत्राद्वारे आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही. पाहता पाहता संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

## फडणवीसांनी तो व्हिडिओ बाहेर काढावा, मी पुराव्यांचा पेन ड्राइव्ह बाहेर काढतो; देशमुखांचे 'ओपन चॅलेंज'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नागपूर**

भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीचे नेते व राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांची धार दिवसागणिक वाढत चालली आहे. फडणवीस यांनी काल पत्रकार परिषद घेऊन अनिल देशमुख यांच्यावर पलटवार केल्यानंतर आज देशमुख यांनीही प्रसारमाध्यमांसमोर येत फडणवीसांना प्रतिआव्हान दिलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अजित पवार, अनिल परब यांच्याविरोधात आरोप करून प्रतिज्ञापत्र देण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला होता. याबाबत मी काल वक्तव्य केलं होतं. मी पुराव्याशिवाय कोणतंही वक्तव्य करत नाही. मी जे काही बोललो, फडणवीसांवर आरोप केले, त्याबाबतचे माझ्याकडे पेन ड्राइव्हमध्ये पुरावे आहेत. त्याचबरोबर देवेंद्र फडणवीस यांना काल माझ्यावर जो आरोप केला आणि सांगितले की मी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर बोलल्याचे व्हिडिओ त्यांच्याकडे आहेत. माझं फडणवीस यांना जाहीर आव्हान आहे की त्यांनी ते व्हिडिओ सार्वजनिक करावेत, असं आव्हान देशमुख यांनी देवेंद्र फडणवीसांना दिलं आहे.



अनिल देशमुख पुढे बोलताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माझे कोणतेही व्हिडिओ नाहीत, फक्त काहीतरी आरोप करायचे म्हणून ते तसे बोलले आहेत. मात्र माझ्यावर वेळ आल्यानंतर किंवा कोणी मला चॅलेंज केल्यानंतर मी पेन ड्राइव्हमधील पुरावे सर्वांसमोर आणणार आहे, अशा शब्दांत देशमुख यांनी फडणवीसांना अप्रत्यक्षरीत्या इशारा दिला आहे.

## संपादकीय ......

# संकल्प उज्ज्वल भविष्याचा

*भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असताना विकास आणि वास्तवाची सांगड घालण्याचे मोठे आव्हान होते. लोकसभा निवडणुकीने त्याप्रकारचा संकेत दिलाच होता. त्यावर वेळीच मार्ग काढला नसता तर ते मोठे संकट ठरते. विशेषत: वाढती बेकारी आणि बेरोजगारी, त्यासोबतच नव मध्यमवर्गाचा व्यवस्थेशी सुटलेपणा, शेतकरीवर्गाची उपेक्षा, वाढत्या महानगरांचे वेगाने वाढत चाललेले प्रश्न या आणि अर्थव्यवस्थेशी निगडित आव्हानांवर उतारा काय, याचे काहीसे सकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी मांडलेल्या अर्थसंकल्पात झालेला दिसतो. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर सरकार स्थापन करण्याइतक्या जागा जिंकता आलेल्या नाहीत. सरकार चालवताना मित्रपक्षांचेच मत विचारात घ्यावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थसंकल्प मांडणे जोखमीचे होते. जागतिक राजकारणातील अस्थिरतेमुळे चलनवृद्धी ही विकासाच्या वेगाला लगाम घालू शकते, असा इशारा आर्थिक पाहणी अहवालाने दिला होता.*

*मागील आर्थिक वर्षात ८.२ टक्के दर आपण साध्य केला होता; परंतु २०२४-२५, म्हणजे चालू वर्षात तो ६.५ ते ६ टक्क्यांपर्यंत घसरेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच अन्य आशियाई अर्थव्यवस्था आणि पाश्चात्त्यांच्या तुलनेत भारताने आर्थिक प्रगती आणि रोजगारनिर्मितीसाठी कृषी क्षेत्रातील क्षमतेचा अद्याप पूर्णपणे वापरच केलेला नाही. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मूलगामी परिवर्तनाची गरज असल्याचे पाहणी अहवालाने नमूद केले होते. कृषी तंत्रज्ञान अद्ययावत करणे, शेतीमध्ये इनोव्हेशन आणणे अशा अनेक सूचना पाहणी अहवालात करण्यात आल्या. याची नोंद घेताना अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीसाठी महत्त्वाच्या योजनांची घोषणा करण्यात आली. ईपीएफओमध्ये पहिल्यांदा नोंदणी केलेल्या कर्मचार्यांना तीन हप्त्यांमध्ये १५ हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर भत्ता मिळणार आहे. २० लाख तरुणांना रोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्यासाठी या संस्थांच्या श्रेणीत वाढ करण्यात येणार आहे, तर विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी प्रत्येकी दहा लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. रोजगारासाठी अर्थसंकल्पात जे उपक्रम योजण्यात आले, त्यातून चार कोटींवर तरुणांना रोजगार मिळू शकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.*

*बेरोजगारीच्या प्रश्नाचा लोकसभा निवडणुकीत भाजपला नक्कीच फटका बसला. देशातील बेरोजगारी नऊ टक्क्यांवर गेल्याचे सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या संस्थेने दाखवून दिले होते; मात्र वेगवेगळ्या प्रकारची आकडेवारी पुढे करून, हा प्रश्न तेवढा काही उग्र नसल्याचे सत्ताधारी पक्षाचे नेते सांगत होते. आता मात्र बेकारीच्या प्रश्नाबाबत ठोस उपाययोजना केली आहे. मुळात कृत्रिम प्रज्ञेमुळे नोकर्यांचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. याखेरीज शिकलेल्या मुलांपैकी निम्म्या लोकांकडे नोकरीसाठी आवश्यक असणारी कौशल्ये नसतात, अशी माहिती समोर आली आहे.*

*२०४७ पर्यंत कृषी क्षेत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण सध्याच्या ४५ टक्क्यांवरून २५ टक्क्यांवर येण्याचा धोका आहे. अशावेळी देशात येत्या पाच वर्षांतच बिगरकृषी क्षेत्रांमध्ये दरवर्षी ७८ लाख नोकर्यांची निर्मिती आवश्यक आहे. अर्थसंकल्पातील प्रोत्साहनांमुळे खासगी कंपन्या मोठ्या प्रमाणात तरुणांना नोकर्या देतील, असे वाटते; परंतु या योजना योग्यप्रकारे राबवल्या गेल्या पाहिजेत, हेही खरे. सरकार बेरोजगारीच्या प्रश्नावर गंभीर नाही, अशी विरोधी पक्षांची टीका होती. आता सरकारने गांभीर्याने उपाययोजना केल्यावर, आमच्या जाहीरनाम्यातील कल्पना चोरल्या, अशी विरोधकांची टीका आहे. म्हणजे 'चित भी मेरी, पट भी मेरी,' महागाई वाढत असून, हे लक्षात घेता नोकरदारांसाठी प्रमाणित वजावट मर्यादा तसेच पेन्शनची मर्यादाही अर्थसंकल्पात वाढवण्यात आली, हे बरेच झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्राप्तिकराच्या नवीन करप्रणालीकडे वळणार्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, भविष्यात जुनी करप्रणाली विसर्जित केली जाईल, असे स्पष्ट संकेत अर्थसंकल्पीय भाषणातून मिळाले आहेत. तसेच प्राप्तिकर कायद्याचा व जीएसटीचाही फेरआढावा घेतला जाणार असून, या दोन्ही कायद्यांतील गुंतागुंत कमी होणे आवश्यकच आहे; मात्र सोने, चांदी व प्लॅटिनमवरील कस्टम ड्युटी कमी करण्याची गरज होती का, असा प्रश्न पडतो. मोबाईल उद्योगाची भरभराट होत असून, मोबाईल चार्जर व अन्य गोष्टींवरील कस्टम ड्युटीही कमी करण्यात आली. मुद्रा कर्ज योजनेत आता दहा लाखांऐवजी वीस लाख रुपयांचे कर्ज मिळेल; मात्र या कर्जांची थकबाकी लक्षणीय आहे, याबाबत दक्षता घेण्याची गरज आहे.*

*'एंजल टॅक्स' रद्द झाल्यामुळे स्टार्टअप कंपन्यांना दिलासा मिळेल. हा कर लादणे ही आपली चूक असल्याचे सरकारने एकप्रकारे मान्यच केले आहे. शेती आणि संलग्न क्षेत्रांसाठी १ लाख ५२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यापलीकडे जाऊन शेतीमध्ये मूलभूत सुधारणा वेगाने राबवण्याची गरज आहे. आर्थिक पाहणी अहवालानेच या बाबीकडे अंगुलीनिर्देश केला आहे. भांडवली खर्चात सातत्याने वाढ आणि वित्तीय शिस्तीचे पालन ही सीतारामन यांच्या अर्थसंकल्पाचे नेहमीचे वैशिष्ट्य याहीवेळी पाहायला मिळाली. कोरोना काळात त्यांच्याच अध्यक्षतेखाली आर्थिक कार्यगट स्थापला होता आणि त्यांनी अर्थव्यवस्थेला यशस्वीपणे संकटातून बाहेर काढले होते. त्यांच्याच कारकिर्दीत भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली. विकसित आणि समृद्ध भारताच्या दिशेने वेगाने वाटचाल करण्याच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पाने निश्चित दिशा अधोरेखित केली. अर्थव्यवस्थेचे खरे बळ असणार्या वर्गाला सोबत घेत निश्चित ध्येय गाठण्याचा संकल्प बराच आश्वासक आहे.*




## नॉन स्टिकमध्ये बनवलेलं जेवण ठरतंय घातक; टेफ्लॉल फ्लूचा मोठा धोका, 'ही' आहेत लक्षणं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती** – आजकाल बहुतेक घरांमध्ये नॉन स्टिक भांडी वापरली जातात. नॉन स्टिक भांडी स्वच्छ करणं सोपं आहे. पण नुकत्याच झालेल्या रिसर्चमुळे या भांड्याबाबत चिंता वाढली आहे. नॉन-स्टिक पॅनमध्ये शिजवलेले अन्न खाल्ल्याने आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात, असं सांगण्यात आलं आहे.



विशेषत: विशिष्ट प्रकारच्या टेफ्लॉल फ्लूचा धोका वाढला आहे.

वॉशिंग्टन पोस्टच्या रिपोर्टनुसार, यूएस पॉइजन सेंटर्सने गेल्या २० वर्षांत पॉलिमर फ्यूम फिव्हर चे ३६०० हून अधिक रिपोर्ट नोंदवले आहेत. नॉन स्टिक पॅन कोटिंग्स संबंधित फ्लूसारखा आजार आहे. २०२३ मध्ये नॉन स्टिक पॅनमुळे होणाऱ्या आजाराची २६७ प्रकरणे आढळून आली. जी खूप जास्त आहेत.

**टेफ्लॉन फ्लू म्हणजे काय?**

टेफ्लॉन फ्लू, याला पॉलिमर फ्यूम फिव्हर असंही म्हणतात. गरम टेफ्लॉन (झढऋए) मधून निघणारा धूर श्वास घेतल्यावर शरीरात जातो. उच्च तापमानात टेफ्लॉनने बनवलेल्या कूकवेअरच्या वापराशी तो संबंधित आहे.

**टेफ्लॉन फ्लूची कारणं**

'टेफ्लॉन फ्लू' याला पॉलिमर फ्युम फिव्हर असंही म्हणतात. नॉनस्टिक कूकवेअर जास्त गरम केल्यामुळे होतो. जेव्हा नॉनस्टिक पॅन, विशेषत: पॉलीटेट्राफ्लुओरोइथिलीन पासून बनविलेले, सामान्यतः टेफ्लॉन म्हणून ओळखले जाते, ५००ओऋ (२६०ओउ) पेक्षा जास्त तापमानाला गरम केले जाते तेव्हा त्यातून धूर येतो. या धुरात परफ्लुओरोक्टॅनोइक ऍसिड (झऋज-) आणि इतर फ्लोरिनेटेड सारखी विषारी रसायनं असतात. जे श्वास घेतल्यास हानिकारक ठरू शकतात.

**टेफ्लॉन फ्लूची लक्षणं**

- **डोकेदुखी**
- **थंडी वाजणं**
- **ताप**
- **मळमळ**
- **छातीत जडपणा जाणवणं.**
- **खोकला**
- **घसा खवखवणे**

ही लक्षणे सहसा संपर्कात आल्यानंतर काही तासांनी दिसतात आणि काही दिवस शरीरात राहू शकतात. ही स्थिती सहसा गंभीर नसली तरी ती अस्वस्थ आणि चिंताजनक असू शकते.

# आता शेत रस्ते घेतील मोकळा श्वास; मातोश्री ग्राम समृध्दी शेत पाणंद रस्ते योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

राज्यात मातोश्री ग्राम समृध्दी शेत-पाणंद रस्ते योजना नोव्हेंबर - २०२१ सालापासून कार्यन्वीत करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश असा की, शेतमाल पोहोचविण्यासाठी रस्ते नसल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. हीच बाब लक्षात घेऊन शासनाने मातोश्री ग्राम समृध्दी शेत-पाणंद योजना लागू केली आहे. या योजनेला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतीसाद मिळतोय.शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करण्यासाठी यंत्रांचा उपयोग केला जातो. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे करण्यासाठी, यंत्रसामुग्री शेतापर्यंत नेण्यासाठी आणि शेतमाल बाजारात पोहचविण्याकरीता बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असते.

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

असे रस्ते तयार करून शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदरील योजना २७ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे 'मातोश्री शेत/पाणंद रस्ते योजना' राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. मात्र, या योजनेच्या माध्यमातून तयार होणाऱ्या रस्त्यांची गुणवत्ता निश्चित केलेली नसल्यामुळे बऱ्याच ठिकाणी शेतरस्त्यांची कामे होऊनही रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटत नाही. पाणंद रस्त्याच्या अभावामुळे शेतमालाच्या वाहतुकीला मर्यादा येतात आणि त्यामुळे शेतकरी फायद्याचे पीकही घेऊ शकत नाहीत. त्यामुळे प्रमाणित दर्जाचे शेत/पाणंद रस्ते तयार करण्याकरिता 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्यास राज्यात मान्यता देण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मापदंडाप्रमाणे




या योजने अंतर्गत अस्तित्वातील शेत/पाणंद कच्च्या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे, रस्ता अतिक्रमणमुक्त करून कच्चा व पक्का रस्ता एकत्रितपणे करणे अशी कामे घेता येणार आहे. राज्यातील सर्व शेत/पाणंद रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (जिल्हा परिषद आणि शासन) मापदंडाप्रमाणे बांधण्यात येणार आहेत. यात फक्त जागेच्या उपलब्धतेप्रमाणे रुंदीमध्ये फरक पडेल. मात्र, रस्त्यांची उंची, खडीचे आकार, खडीच्या परताची जाडी, रस्त्याच्या दोन्ही बाजूचे निचऱ्यासाठीचे नाले, रस्त्यांच्या बाजूला वृक्ष लागवड, गुणवत्तेची चाचणी इत्यादी सर्व बाबी मानक मापदंडाचे असणार आहेत.

**६०:४० या प्रमाणानुसार निधी उपलब्ध** - प्रत्येक रस्त्याच्या कामावर अकुशल-कुशल खर्चाचे प्रमाण ६०:४० राखण्यासाठी राज्य रोहयोतून पूरक कुशल निधी उपलब्ध करून देण्यात येईल.या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकाप्रमाणे प्रस्तावित दर्जाचे रस्ते तयार करण्यासाठी अंदाजपत्रके बनवण्यात येईल. यामध्ये मनरेगा-कुशल घटक, अकुशल घटक राज्य रोहयो-कुशल घटक याप्रमाणे खडीकरणासह पक्क्या रस्त्याचे प्रतिकिलोमीटर अंदाजपत्रक अंदाजे २३ लाख ८४ हजार इतके तर मुरमाच्या पक्क्या रस्त्याचे प्रतिकिलोमीटर अंदाजपत्रक अंदाजे ९ लाख ७६ हजार रुपये इतके होते. तथापि ज्या ज्या वेळी 'डीएसआर' बदलेल त्याप्रमाणे अंदाजपत्रक बदलेल.त्यानंतर त्यांच्याकडून रोहयो सचिव आणि सचिवांकडून ग्रामविकास मंत्री यांच्याकडे सर्व राज्यातील ग्रामपंचायतींच्या आराखड्यांची यादी पाठवली जाऊन ग्रामपंचायत निहाय शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांना पूरक निधी मंजूर करावयाच्या यादीस मान्यता मिळते. ग्रामपंचायतीने अतिक्रमीत रस्त्यांच्या बाबतीत शेतकऱ्यांची बैठक घेऊन अतिक्रमण दूर करणे अपेक्षित आहे. ग्रामपंचायत स्तरावर निर्णय न झाल्यास तालुका स्तरावरील समितीकडे प्रकरणे सादर करून पोलिसांची मदत घेता येईल. रस्ते तयार करण्यासाठी जिल्हा स्तरावर राबविल्या जाणाऱ्या इतर योजनांच्या माध्यमातूनही निधी उपलब्ध करून दिला जाईल. ग्रामीण भागात शेतरस्त्यांची भूमिका गावाच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणा साठी महत्वाची आहे. अशा रस्त्यांमुळे शेती विकासालाही चालना मिळू शकेल. त्यामुळेच 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' महत्वाची ठरणार आहे.

### कशी आहे प्रक्रिया..

शेत/पाणंद रस्ता तयार करण्यासाठीचे मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यानच्या कालावधीत ग्राम विकास विभागाने ग्रामीण रस्ते तयार करण्यासाठी विहित केलेले मापदंड लागू राहतील. रस्ते तयार करण्यासाठीच्या सुस्पष्ट सूचना शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत.

शेत/पाणंद रस्ते ग्राम पंचायत, जिल्हा परिषद बांधकाम विभाग/उप विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग/उप विभाग, वन जमीन असेल तेथे वनविभागामार्फत तयार करण्यात येतील. ग्रामपंचायतीने रस्त्यांचा आराखडा ग्रामसभेच्या मंजूरीने तयार करून गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर करायचा असून ते तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या शेत/ पाणंद रस्त्यांची यादी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करतील.

# अचलपूर उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाला आयएसओ मानांकन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अचलपूर** – अचलपूर येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाला नुकताच आयएसओ मानांकन मिळाले आहे. शासकिय सेवा देणाऱ्या विविध कार्यालयाने त्यांच्या नाविन्यपूर्ण कामासाठी हे मानांकन दिले जाते. प्रशासकिय कार्यालयातील उद्दिष्ट पूर्ण करत योग्य त्या सेवा देण्यासाठी या कार्यालयाच्या वतीने केलेल्या कामाची दखल घेण्यात आली आहे.

हे मानांकन आंतरराष्ट्रीय प्रमाण संस्था आयएसओ अंतर्गत १५० देशांशी संलग्नित आहे. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅंडडायझेशन म्हणजे आयएसओ ही स्वतंत्र संस्था आहे. उपसंचालक भूमी अभिलेख अमरावती प्रदेश डॉ. लालसिंग मिसाळ , जिल्हा भूमी अधीक्षक महेश कुमार शिंदे ,वेद असोसिएट पूजा यांच्या मार्गदर्शनात हे प्रमाणपत्र गजानन डोईफोडे उपअधीक्षक भूमी अभिलेख अचलपूर यांना मिळाले. याप्रसंगी उमेश शर्मा, मनोज कडू, सागर आमले, कु. एस. आर. मालोकार, अभि जीत माने, भूषण गोमकाळे, अरुण गोहत्रे उपस्थित होते.



# केंद्राच्या परदेशी शिष्यवृत्तीत महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांना फटका

## राज्यवार कोटा सिस्टीमने दीडशे पात्र, ठरले अपात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर :-** केंद्र सरकारने यावर्षीपासून परदेशी शिष्यवृत्ती योजनेत राज्यवार कोटा प्रणाली लागू केली. या कोटा प्रणालीचा यंदा सर्वाधिक फटका महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांना बसला. कोटा सिस्टीममुळे महाराष्ट्रातील पात्र असलेले तब्बल १४९ विद्यार्थी अपात्र ठरले. या यादीत गुजरातच्या केवळ ६ विद्यार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले.

परदेशी विद्यापीठात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मागासर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्याप्रमाणे केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागातर्फे परदेशी शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. याअंतर्गत देशभरातील १२५ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएचडीच्या अभ्यासक्रमात शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. परदेशी विद्यापीठाच्या जागतिक मानांकनानुसार विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जातो. यंदा या योजनेसाठी महाराष्ट्रातून ३०५ विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर व पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज केले होते. त्यातील १७१ विद्यार्थी पात्र ठरले तर इतर विद्यार्थी कागदपत्रांच्या चुकांमुळे अपात्र ठरले. मात्र पात्र ठरलेल्या १७१ पैकी केवळ २२ विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला असून इतर १४९ विद्यार्थी पात्र असूनही कोटा प्रणालीमुळे योजनेचे लाभार्थी ठरू शकले नाही. विशेष म्हणजे यातील जवळपास १०० विद्यार्थ्यांचे जागतिक मानांकनात पहिल्या ५० मध्ये असलेल्या विद्यापीठात नंबर



लागले आहेत. तरी ते योजनेचे लाभार्थी ठरू शकले नाही. देशभरातून योजनेसाठी ७५० च्यावर अर्ज प्राप्त झाले होते.

**महाराष्ट्रातील विद्यार्थी असतात अधिक**–विशेष म्हणजे केंद्राच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थी अधिक असतात. याचे कारण महाराष्ट्र राज्याच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेत केवळ ७५ विद्यार्थ्यांनाच लाभ मिळतो.

त्यामुळे ते केंद्र सरकारच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेकडे धाव घेतात.

### केंद्र सरकारचाही कोटा कमीच

जेव्हा राज्यात १००, २०० विद्यार्थ्यांना लाभ दिला जात असताना केंद्र सरकारद्वारे देशभरातून केवळ १२५ विद्यार्थ्यांची मर्यादा ठरविण्यात आली आहे. त्यातही आता राज्यनिहाय कोटा प्रणाली ठरविण्यात आल्याने त्याचा फटका महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांनाच होणार आहे, कारण येथेही केवळ ७५ जागांची मर्यादा आहे.

### इतर राज्यांच्या योजनेत लाभ जास्त

– मात्र कर्नाटक राज्यात सर्वाधिक ५०० विद्यार्थी, आंध्र प्रदेशात २००, राजस्थान मध्ये २०० विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. केरळ राज्यात तर मागतील तेवढ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पात्रतेनुसार लाभ दिला जातो. इतरही राज्यात हा आकडा १०० हून अधिकच आहे. महाराष्ट्रातून केवळ ७५ विद्यार्थ्यांना पाठविले जाते.

विदर्भ प्रजासत्ताक
बुधवार दि. २५ जुलै २०२४
शहर/ग्रामिण

# ... अखेर केंद्र प्रमुखांचे पदोन्नतीचे आदेश निघाले

## प्रहार शिक्षक संघटनेच्या आक्षेपामुळे लागला होता ब्रेक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** अनेक वर्षांनंतर केंद्र प्रमुखांच्या पदोन्नतीला मुहूर्त मिळाला; परंतु सदर प्रक्रिया नियमबाह्य करण्यात आल्याचा आक्षेप प्रहार शिक्षक संघटनेने घेतला होता. त्यामुळे पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होऊनही त्याबाबतचे आदेश अद्याप जारी करण्यात आले नव्हते. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांनी याबाबतची शहानिशा केल्यानंतर नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले.

जिल्ह्यात १३९ केंद्र प्रमुखांची पदे मंजूर असून, यातील ६९ पदे ही भरतीने, तर ७० पदे पदोन्नतीने भरणे अपेक्षित आहे. यातील १७ पदे कार्यरत असून, ५३ पदांकरिता पदोन्नतीची प्रक्रिया ९ जुलै रोजी राचविण्यात आली. पदोन्नतीकरिता प्रशिक्षित पदवीधर, विषय शिक्षक व मुख्याध्यापक अशा १६६ जणांना बोलाविण्यात आले होते. यामध्ये सर्वसाधारण गटातील १६० पैकी ५१ जणांना, तर दिव्यांग संवर्गातून ६ पैकी २ जणांना केंद्रप्रमुख म्हणून पयोन्नती देण्यात आली आहे. समुपदेशनाद्वारे पदोन्नती झालेल्यांना ठिकाणदेखील देण्यात आले; परंतु अद्याप या केंद्रप्रमुखांना पदस्थापनेचे आदेश देण्यात आले नाही. याप्रक्रियेवर आधीच प्रहार शिक्षक

संघटनेने आक्षेप घेतला होता. सेवाज्येष्ठता यादीत ज्या साहाय्यक शिक्षकांनी उच्च शैक्षणिक पात्रता धारण केलेली आहे, त्यांचा या यादीत समावेश करण्याची मागणी राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केली होती, परंतु या आक्षेपाकडे दुर्लक्ष करीत शिक्षण विभागाने ही प्रक्रिया राबविली. दरम्यान, संजिता मोहपात्रा यांनी आधी आक्षेपाचे निराकरण करण्याचे आदेश शिक्षण विभागाला दिल्याने संबंधित केंद्रप्रमुखांची पदोन्नती होऊनही अधिकृत आदेश निघाले नव्हते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सीईओंकडे पाठपुरावा केला, त्यानुसार अखेर केंद्रप्रमुखांच्या नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले.

# बुधवाऱ्यातील बोगस महिला डॉक्टरविरुध्द गुन्हा

## मेडिकल कौन्सिलच्या आदेशावरून सुजोग ॲक्युपंक्चर नॅचरोपॅथी क्लिनिकवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** बुधवाऱ्यात सुजोग ॲक्युपंक्चर नॅचरोपॅथी क्लिनिक चालविणाऱ्या बारावी उत्तीर्ण बोगस महिला डॉक्टरविरुध्द खोलापुरीगेट पोलिसांनी मनपा आरोग्य विभागाचे अधिकारी फिरोज खान असद खान (रा. जमील कॉलनी) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. रश्मी सुमीत मिथानी (वय ३०) असे गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टर महिलेचे नाव आहे.

स्थानिक बुधवारा परिसरात गेल्या काही महिन्यापासून एका महिला डॉक्टरने सुजोग ॲक्युपंक्चर नॅचरोपॅथी क्लिनिक सुरु केले. त्याचे मोठे फलक लावले होते. त्यावर मानेचा त्रास. नस दुखने, कंबरेचा त्रास. कंबर व मानाच्या मनक्यामध्ये अंतर येणे, ऑपरेशननंतरच्या जखमा, गुडघ्याचा त्रास, थॉयराइड, मधुमेह. लठ्ठपणा, मानसिक संतुलन. पिंपल्स, वांग, सायटीक अशा अनेक आजारावर उपचार केले जातात.असे ठळकअक्षरात त्या फलकावर लिहले. त्यावरून क्लिनिकमध्ये रुग्णांची संख्यासुध्दा वाढली. परंतु डॉक्टरनी त्यांची पदवी कुठेही लिहिली नव्हती. ही बाब एका व्यक्तीच्या निदर्शनास येताच त्याने संबंधीत डॉक्टरबाबत माहिती घेतली. तेव्हा महिला डॉक्टर कला शाखेतून बारावी उत्तीर्ण आहे. असे समजताच त्यांनी मेडीकल कौन्सिल ऑफ इंडीयायांच्याकडे रितसर तक्रार



केली. त्याआधारावर त्यांनी संबंधीत प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश संबंधीत विभागाला दिले. मनपा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी क्लिनिकची पाहणी केली. तेथे ॲक्युपंचरनिडल्स. मॅग्नेट, गोल मॅग्नेट पॅचेस, बॉडी डेहॉक्स मशीन, सर्क्युलेशन मशीन. स्टीम लेटींग मशीन आढळल्या. त्यांना वैद्यकीय पदवीची विचारणा केली, तेव्हा महिलेने इंटरनॅशनल सुजोग असोशियशनच्या (आयएसए) सुजोग थेरपी अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र अधिकाऱ्यांना दाखविले. त्या व्यतिरिक्त त्या महिला डॉक्टरकडेवैद्यकीय शैक्षणिक अर्हतेचे कोणतेही प्रमाणपत्र नव्हते. डॉक्टर महिलेने स्वतःच्या व्हीजींटींग कार्डवर व क्लिनिकच्या फलकवर तसेच स्वतःच्या नावासमोर डॉक्टर पदवी लिहीलेली आणि त्याखाली डीवायएनएस व क्लिनिकाचे माव लिहले होते. याबाबत त्या समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत. त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# दोषसिद्धी स्थगितीसाठी सुनील केदार यांची सर्वोच्च न्यायालयामध्ये धाव

## याचिकेवर शुक्रवारी सुनावणी : आगामी विधानसभा निवडणूक लढण्याचे स्वप्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ नागपूर :–** आगामी विधानसभा निवडणूक लढण्याचे स्वप्न असलेले सावनेरचे अपात्र आमदार सुनील केदार यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील १५० कोटींपेक्षा जास्त रकमेच्या सरकारी रोखे खरेदी घोटाळ्यातील दोषसिद्धीला अंतरिम स्थगिती मिळविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर येत्या शुक्रवारी न्यायमूर्तिद्वय सूर्यकांत व के. व्ही. विश्वनाथन यांच्यासमक्ष सुनावणी होणार आहे.

नागपुरातील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने २२ डिसेंबर २०२३ रोजी केदार यांना भादंविच्या कलम ४०९ (शासकीय नोकर, आदींद्वारे विश्वासघात), ४०६ (विश्वासघात), ४६८ (बनावट दस्तऐवज तयार करणे), ४७१ (बनावट दस्तऐवज खरे भासविणे) व १२०–ब (कट रचणे) या गुन्ह्यांतर्गत दोषी ठरवून कमाल पाच वर्षे सश्रम कारावास व एकूण १२ लाख ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा सुनावली आहे. कारावासाची शिक्षा दोन वर्षे व त्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्यांना लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८ (३) अनुसार आमदार म्हणून सहा वर्षांकरिता अपात्र ठरविण्यात आले आहे. यासंदर्भात विधिमंडळ सचिवालयाने २३ डिसेंबर २०२३ रोजी अधिसूचना जारी केली आहे.

केदार यांना ही कारवाई रद्द करण्यासाठी दोषसिद्धीला स्थगिती मिळविणे आवश्यक आहे. त्याशिवाय ते आगामी विधानसभा निवडणूक लढवू शकत नाही. त्यामुळे त्यांनी दोषसिद्धीला स्थगिती मिळविण्यासाठी सर्वप्रथम सत्र न्यायालयात अर्ज



दाखल केला होता. सत्र न्यायालयाने ३० डिसेंबर २०२३ रोजी तो अर्ज नामंजूर केला.

त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ४ जुलै २०२४ रोजी त्यांचा यासंदर्भातील अर्ज फेटाळून लावला. परिणामी, त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

# कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात

## महिलेचा मृत्यू, दोन जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५वरुड –** वरूड पोलिस स्टेशन हद्दीतील नागपूर रोडवरील सुरळी गावालगत असणार्या भोंड यांच्या पेट्रोल पंप समोर मंगळवार २३ जुलै रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास हुन्डाई कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला आहे. या अपघातात एका महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर दोघे किरकोळ जखमी झाले.

माहितीनुसार, सेवानिवृत्त प्राचार्य ओमप्रकाश जयस्वाल (६७) त्यांची पत्नी राजकुमारी जयस्वाल (६२) व कार चालक राजेश्वर गजभारे (३२) सर्व रा.सिडको जि.नांदेड हे त्यांच्या हुन्डाई कार क्रमांक एमएच ११२६ एके ७१८९ ने सकाळी नांदेड येथून नागपुर जिल्ह्यातील काटोल येथे त्यांचे जावाई सौरभ जयस्वाल यांच्या वडीलांच्या अंत्यसंस्कारासाठी आले होते. तेथून रात्री ९ वाजता नांदेडकडे जाण्यासाठी कारने निघाले होते. त्यांच्या कारवरील चालक राजेश गजभारे याचे सुरळी येथील भोंड पेट्रोल पंपासमोर अचानक नियंत्रण सुटल्याने कार रोडला खोदुन ठेवलेल्या रस्यावरून खाली गेल्याने अपघात झाला.

या अपघातात मागच्या सिटवर बसलेल्या राजकुमारी जयस्वाल यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ओमप्रकाश जयस्वाल हे चालकाच्या बाजुला बसले असल्याने त्यांच्या मानेला, मनक्याला व उजव्या हाताला मार लागला व चालका दुखापत झाली. अपघातात कारच्या समोरील हेडलाईट, चारही दरवाजे तुटले, समोरील काच फुटली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आले. जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. माझ्या पत्नीच्या मृत्यूसाठी चालक राजेश गजभारे जबाबदार असल्याचे ओमप्रकाश जयस्वाल यांनी पोलिस तक्रारीत नमूद केले आहे. पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपासात घेतला आहे.



# झुंज धबधबा वायतोय ओसांडून .....

अमरावती जिल्ह्यात गेल्या आठवड्याभरात पावसाने दमदार बॅटिंग केली...त्यामुळे जिल्ह्यातील धबधबे प्रवाहित झाले आहेत... अमरावतीच्या वरुड तालुक्यातील झुंज गावाजवळून वाहणारी वर्धा नदी देखील खळखळून वाहत आहे.. या ठिकाणी असलेला झुंज धबधबा हा सध्या चांगलाच प्रवाहित झाला आहे... झुंज धबधब्याचे हे विहंगमदृश्य सध्या पर्यटकांना चांगलंच आकर्षित करत आहे..

# मुख्याध्यापकाला लाच घेताना रंगेहाथ अटक

## एन.टी.आर. शाळेतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५वरुड–** शहरातील नामांकित एन. टी. आर. हायस्कूलच्या मुख्याध्यापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून १ हजाराची लाच स्विकारताना मंगळवार २३ जुलै रोजी रंगेहाथ पकडले. माहितीनुसार, तक्रारदार यांनी २२ जुलै रोजी लाचलुचपत विभागाकडे तक्रार दिली होती. त्यात नमूद करण्यात आले होते की, त्याना मुलगी आरूषी व मुलगा रियाल असे दोन अपत्य आहेत. दोन्ही मुले वरूड शहरातील नामदेवराव तुकारामजी रडके हायस्कुलमध्ये शिक्षण घेतात. मुलगी ही इयत्ता ९ व्या वर्गात शिकत असून मुलगा रियाल याला चालू वर्षी ५ व्या वर्गात प्रवेश मिळाला आहे. एन. टी. आर. हायस्कुल ही शाळा १०० टक्के अनुदानीत आहे.



तक्रारदार हे १९ जुलै रोजी एन. टी. आर. हायस्कुल येथे मुलगा रियाल यांचे बोनाफाईड काढण्यासाठी गेले होते. तेव्हा त्या शाळेतील मुख्याध्यापक योगेश बरडीया यांनी शाळा १०० टक्के अनुदानीत असून सुद्धा रियाल याला ५ व्या वर्गात प्रवेश दिल्याचा मोबादला म्हणून १ हजाराची मागणी केली होती.ही मागणी नियमबाह्य होती. अशी लेखी तक्रार तक्रारकर्ते यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे केली होती. सदर तक्रारीची पडताळणी करण्यात आली. त्यात सत्यता आढळली. त्या आधारावर मंगळवार २३ जुलै रोजी दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला असता मुख्याध्यापक योगेश बरडीया यांनी त्यांच्या कार्यालयात १ हजाराची लाचेची मागणी करून स्विकारली तेव्हा त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची रात्री उशिरापर्यंत चौकशी करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या विरूध्द वरूड पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरिक्षक केतन मांजरे, योगेश दंदे, वैभव जायले, आशिष जांभोळे, विनोद रायपुरे, कुणाल काकडे, सतीश किटुकले यांनी पार पाडली.

# धार्मिक, शैक्षणिक संस्थांच्या इमारतीवर शासनाची कर्जमाफी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** महाराष्ट्र कर व शुल्क नियम १९६० चे कलम ७ (२) क अन्वये केवळ धार्मिक आणि शैक्षणिक कार्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या धार्मिक आणि शैक्षणिक संस्थांच्या इमारतीवर राज्य शासनाने करमाफी दिली असल्याचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे माजी प्रांतीय अध्यक्ष एस. जी. बरडे यांनी कळविले आहे.

महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायती नियमातील तरतुदी लक्षात न घेता करतात आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियमानुसार जप्तीची कारवाई करतात. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत महाराष्ट्र कर व फी नियम १९६० चे कलम ७ (२) मधील तरतुदीनुसार केवळ धार्मिक आणि शैक्षणिक कार्यासाठी (वसतिगृहे, कर्मचारी निवासगृहे वगळून) वापरात आणल्या जाणाऱ्या इमारतींना कर आकारणीतून सूट देण्यात आलेली असल्यामुळे कराचा प्रश्नच उद्भवत नाही, असे एस. जी. बरडे म्हणाले.

# उपायुक्त माधुरी मडावी पोहचल्या शहरातील विविध भागात

## नाल्यांची पाहणी, दुकानांची तपासणी –थेट कारवाई, सफाई कर्मचार्यांची हजेरी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांची कार्यशैली शहरात चर्चेचा विषय झाली असून त्यांच्या कामाची प्रशंसा होत आहे. बुधवार २४ जुलै रोजी त्यांनी शहरातल्या विविध भागात जावून पाहणी केली. काही ठिकाणी थेट कारवाई केली तर कर्मचार्यांची पण हजेरी घेतली.

उपायुक्त मडावी यांनी सर्व प्रथम कंवर नगर येथील चवरे मार्केटची पाहणी केली. तपासणी दरम्यान २ दुकानांमध्ये प्लास्टीक आढळून आले. मंगलानी व अरोरा वाईन शॉप यांना प्रत्येकी ५ हजार दंड करण्यात आला. एका दुकानदाराने दंड न भरल्यामुळे ते दुकान सिल करण्यात आले. त्यानंतर त्यांनी नवीवस्ती बडनेरा येथील सफाई कामगारांचे हजेरी पत्रक तपासले. समता चौक बडनेरा येथे पान व चहा टपरी वाल्याने कचरा केल्याचे आढळल्यावर त्याला पाच हजार दंड ठोठावण्याचे निर्देश त्यांनी दिले. ज्या दुकानाजवळ कचरा आढळून आला, त्यालाच जबाबदार धरण्यात येईल, अशी सक्त सूचना त्यांनी दिली.

अंत्यत वर्दळीच्या राजकमल चौकातील नाल्याची पाहणी उपायुक्त मडावी यांनी केली. पाहणी दरम्यान पाणी अडलेल्या नाल्या जेसीपीद्वारे मोकळ्या करण्याच्या सूचना दिल्या. ही कारवाई लगेच करण्यात आली. कंवर नगर चवरे मार्केट परिसर साफ करण्याच्या सूचना दिल्या. नाली सफाई करताना गाळ काढून ठेवला जातो तो उचलण्याची व्यवस्था करण्यासाठी संबंधीत उपअभियंते यांना नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. अतिक्रमण विभागाने नाले साफ सफाई करत असताना पाण्याच्या प्रवाहात गाळ येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. नागरिकांनीही नाल्यात कचरा टाकू नये.

महानगरपालिका नाले साफ करते पण नागरिक त्यामध्ये गाद्या, घरातील टाकाऊ वस्तू, पूजेचे साहित्य, या सारखे अनेक प्रकारचे



साहित्य टाकतात.

त्याने नाल्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होवून अनेक वस्त्यात पाणी शिरण्याची शक्यता आहे. नागरिकांनीही सतर्क राहून कोणालाही नाल्यात कचरा फेकू देवू नये. नागरिकांना कोणतीही असुविधा होऊ नये, याबाबत विशेष काळजी घ्यावी, अशा सूचना उपायुक्त मडावी यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. राजकमल चौकातील अतिक्रमीत पानठेले त्यांनी काढून टाकले. आढळून आल्याने अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. सायंस्कोर मैदान परिसरातल्या हॉकर्स वाल्यावर कारवाई करण्यात आली. पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, उपअभियंता प्रमोद इंगोले, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक विकी जेधे, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# फेरीवाल्यांना लवकरच हॉकर्स झोनमध्ये पाठविणार

## रस्त्यालगतची जागा अडविण्यावर कायमस्वरूपी तोडगा काढणार



**लवकरच हॉकर्स झोन**

हॉकर्समुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचरा होत आहे. त्यासाठी त्यांनी डस्टबिन वापरावे. वाहतुकीला अडथळा होणार नाही, अशा प्रकारे व्यवसाय करावा, जेणेकरून शहर स्वच्छ राहील, याला प्राधान्य दिले जात आहे. मात्र, लवकरच हॉकर्स झोनमध्ये त्यांना कसे पाठवता येईल, याबाबत निर्णय घेतला जाईल.

– माधुरी मडावी, उपायुक्त प्रशासन, मनपा.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

शहरात मुख्य चौक, बाजारपेठा, मुख्य रस्त्यांवर जागा अडवून फेरीवाले (हॉकर्स) वाहतुकीला अडथळा तर करतातच शिवाय त्यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात कचराही निर्माण होत आहे. शहरात हॉकर्स झोन निश्चित झाले असून तेथे या हॉकर्सला कशाप्रकारे पाठवता येईल, याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल. यासाठी मनपात बैठक बोलावली जाणार असल्याचे मनपाच्या स्वच्छता विभागाद्वारे सांगण्यात आले. प्रत्येक दुकानदाराने दोन डस्टबिन ठेऊन कचरा त्यातच टाकावा. तसेच दुकाना पुढे पूर्ण स्वच्छता ठेवावी. स्वास्थ निरीक्षकांनी त्यांच्या परिसरात संपूर्ण स्वच्छतेचे नियोजन करण्याचेही निर्देश उपायुक्त प्रशासन यांच्याद्वारे देण्यात आले. इतवारा परिसर संपूर्ण स्वच्छ व्हावा, यासाठी या परिसरातील स्वच्छता कर्मचारी. व्यापारी व हॉकर्स यांनी संयुक्त स्वच्छता मोहीम राबवावी. अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या. इतवारा परिसरातील भाजी मार्केटमध्ये नालीवर कोणीही दुकान लावू नये, असे सक्त निर्देश यावेळी उपायुक्तांनी दिले. शहरातील अतिक्रमण, पदपथांवर मुक्काम ठोकणारे फिरस्ते आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून संयुक्त कारवाई केली जात आहे.

दुकानाबाहेर कचरा आढळून आल्याने दुकानदाराला त्वरीत साफकरण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. इतवारा परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर महापालिका धडक कारवाई करीत आहे.

# अमरावती तहसीलमध्ये २६ ला महाराजस्व अभियान

## आ.राणा यांच्या पुढाकारातून भव्य आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती –**

भातकुली तालुक्यातील ग्रामीण भाग तसेच शहरी भागातील नागरिकांकरीता आमदार रवी राणा यांच्या पुढाकारातून अमरावती तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये २६ जुलैला महाराजस्व अभियानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

बडनेरा मतदारसंघातील नागरीकांना एकाच छताखाली विविध शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याकरीता २६ जुलै – २०२४ रोजी सकाळी १० वाजता तालुका प्रशासकिय इमारत नवीन तहसिल कार्यालय, अमरावती येथे महाराजस्व अभियान हा लोकाभिमुख कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. या महाराजस्व अभियानामध्ये शासनाकडून सर्व योजनेचे स्टॉल लावण्यात येईल. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, अमरावती महानगरपालिकेतीलविविध योजनेचा स्टॉल, कामगार विभागाच्या योजना, वयोश्री योजना व मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, आयुष्मान भारत योजना, पिक विमा व मुद्रा लोन योजना, कृषी विभागासंबधी सर्व योजना, पि.आर. कार्ड व जागेच्या सनद संबधी, रेशनकार्ड, बालसंगोपण योजना, जिल्हा उद्योग विभागातील योजना, संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजना, पंचायत समिती अंतर्गत घरकुल व इतर सर्व योजना, दिव्यांगाच्या सर्व योजना,महावितरण संबंधी शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांकरीता योजना, आदिवासी समाज, वनविभाग संबधी, शिक्षण विभागासंबधी तसेच निवडणूक विभागाकडून या ठिकाणी स्टॉल लावण्यात येणार आहे. महाराजस्व अभियानात गरीब कुटुंबातील नागरीकांना एकाच छताखाली शासनाच्या सर्व योजनेचा लाभ घेता येणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील नागरीकांनी उपस्थित रहावे. असे आमदार रवि राणा यांनी आवाहन केले आहे.

# अमरावतीत उद्यापासून प्रथमच 'सिंधी फिल्म फेस्टीवल'आठवडाभरात १४ चित्रपट बघण्याची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावतीदि.२५** – उद्या २६ जुलैपासून येथील सरोज सिनेमागृहात पहिल्यांदाच 'सिंधी फिल्म फेस्टीव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत रसिकांना दररोज दोन याप्रमाणे १४ चित्रपट बघण्याची संधी प्राप्त झाली आहे. विदर्भ सिंधी विकास परिषदेचे अध्यक्ष तथा म.रा. सिंधी साहित्य अकादमीचे सदस्य तुलसी सेतीया यांनी माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. त्यांच्यामते फेस्टिव्हलमध्ये दाखविले जाणारे चित्रपट देशाच्या विविध भागात तयार झाले आहेत. यामध्ये 'वरदान-२', 'पहिजो हिकिडो ई बार आ', 'कर्ज','ट्रपड टेशन ते', 'वाईसर ई गुम', 'आखरीन ट्रेन', 'खट्टो मिड्ढो' या चित्रपटांचा समावेश आहे. हे सर्व चित्रपट सामाजिक, रोमांचक व मनोरंजक असे आहेत. या आयोजनासाठी म.रा. सिंधीसाहित्य अकादमीसह शहराच्या विविध भागांतील पूज्य पंचायती, सिंधी युवा मंच, संत कंवरराम सेवा प्रतिष्ठान, संत कंवरराम प्रीमिअर लीग, बढ़ते कदम, सिंधूनगर बॉइज व लेडीज ग्रुप आदी संस्थांनी पुढाकार घेतल्याचेही यावेळी सांगण्यात आले. आत्माराम पुरसवानी, डेटाराम मनोजा, जुम्मन बजाज, राजकुमार झांबानी, महेक सोजरानी आदी उपस्थित होते.

# यवतमाळ नागरी सहकारी बँकेच्या तत्कालीन शाखा, क्षेत्रीय व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा

## खातेदाराच्या परवानगीशिवाय सहा कोटी रुपये ट्रान्सफर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

यवतमाळ नागरी सहकारी बँकेच्या भोंदू संकुलस्थित अमरावती शाखेचे तत्कालिन शाखा व्यवस्थापक आणि क्षेत्रीय व्यवस्थापकाविरुद्ध ५ कोटी ९४ लाख १८ हजार ३८४ रुपये परस्पर दुसऱ्या खात्यात वळते केल्याप्रकरणी राजापेठ पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. मात्र २०१९ पासून सुरू असलेल्या या प्रकरणात बँकेने अद्यापपावेतो संबंधितांना रक्कम परत केलेली नाही.

बँक अधिकाऱ्यांनी ऊर्जा मल्टी सर्विसेज या अक्रीयाशिल खातेदाराकडून कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी अन्य खातेदार के. कुमार राजा प्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड यांच्या खात्यातून तब्बल ५.९४ कोटी रुपये त्यांचा कुठलाही धनादेश वा त्यांच्या पूर्वसूचनेशिवाय ऊर्जा मल्टी सर्विसेज यांच्या कर्ज खात्यात वळते केले होते. या अनाधिकृत व्यवहाराविरोधात डॉ. के कुमार राजा यांनी के कुमार प्रोजेक्ट्स कंपनीतर्फे २०१९ मध्येच लेखी आक्षेप नोंदवून आरबीआयमध्ये तक्रार नोंदविल्यानंतर यासंदर्भात राजापेठ पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.




खातेदाराने आक्षेप नोंदविल्यानंतर बँकेने एक संशयास्पद कागद समोर आणला होता, त्याच्या शेवटच्या पानावर के कुमार राजा प्रोजेक्ट्सच्या संचालकांचे बनावटी हस्ताक्षरअसल्याचे सांगितले जात आहे. संबंधित दस्तावेज २०१५ मध्ये ऊर्जा मल्टीसर्विसेसने बँकेला कर्ज घेतेवेळी दिलेला होता. या संपूर्ण प्रकरणात बँकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसांनी तूर्त यवतमाल अर्बन बँकेच्या तत्कालीन शाखा व्यवस्थापक व क्षेत्रीय व्यवस्थापकाविरुद्ध खातेदाराचा विश्वासघात केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. मात्र या कटाचा मुख्य सूत्रधार कोण, ही बाब पोलीस तपासातून पुढे येणार आहे. या प्रकरणात आरोपींच्या संख्येत वाढ होऊ शकते, असाही अंदाज वर्तविला जात आहे.

# बाथरुमच्या बाजूचे टिन काढून बालक पसार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती –**

स्थानिक रुक्मिनीनगर येथील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालसुधार गृहातील एक अल्पायवीन मुलाने बाथरुमच्या बाजुचा टिन काढून तो पसार झाल्याची घटना मंगळवारी (ता. २३) सकाळी उघडकीस आली. फ्रेजरपुरा पोलिसांनी काळजीवाहक राजू सावळे (वय ५९ रा. विठाईनगर) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. विजय कॉलनी, रुक्मिनीनगर येथील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व




बालगृहात कनिष्ठ काळजीवाहक राजू सावळे आहेत. २२ जुलैला त्यांची रात्रपाळी ड्युटी होती. रात्री ९ वाजता ते कर्तव्यावर हजर झाले. त्यावेळी बाल न्याय मंडळाचे ९ बालक रुममध्ये होते आणि बालकल्याण समितीच्या रुममध्ये १२ बालक होते. दुसऱ्या दिवशी साकळी ६ वाजताच्या सुमारास वर्ग दहावीमध्ये शिकणारे ४ बालक गेट खोलून शिकवणीकरीता गेले. त्यानंतर सावळे वरील माळ्यावर बाल कल्याण समितीच्या रुममध्ये गेले असता त्यांना ११ बालक दिसले. एक बालक कुठे गेला, याबाबत विचारपूस केली असता तो बाथरुमच्या बाजुचा टिन काढून जिण्यावरून उडी घेऊन पळून गेल्याचे त्यांना सांगण्यात आले. सावळे यांनी बालकाचा शोध घेतला. परंतु तो कुठेच मिळून आला नाही. त्यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दिली.त्याआधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# मंगरुळ दस्तगीर हद्दीतील ५ गावठी दारूअड्ड्यांवर पोलिसांची धाड

## ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५धामणगाव रेल्वे,**

१२गावठी हातभट्टी दारू काढणाऱ्या व विकणाऱ्यावर मंगरुळ दस्तगीर पोलीसांनी ठाणेदार गौतम इंगळे यांच्या नेतृत्वात कारवाई केली असून पाच आरोपितांकडुन ६०० लीटर मोहामाच सडवा, ८१ लीटर गावठी हातभट्टी दास, १ मोटरसायकल व दारू गाळण्याचे साहित्य असा एकूण ८९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला,तालुक्यातील वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या विटाळा येथे वर्धा नदीच्या काठावर आरोपी विलास निळकंठ डाहे हा काठावर दगडाच्या चुलीवर लोखंडी ड्रम ठेवून गावठी हातभट्टीची दास काढताना दिसला. त्याला पोलिस आल्याचे चाहुललागताच त्याने पळ काढला. येथून पोलिसांनी ६२ हजार रुपयांचा माल जप्त केला. तसेच आरोपी मनोज नारायण काळे हा नदीच्या काठावर गावठी हातभट्टीची दारू काढताना दिसला. त्याला पोलिस आल्याची चाहुल लागताध्धे तो तेथून पळून गेला. सदर



ठिकाणवरुन असा एकूण २२ हजार ५०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे विटाळा येथे पोलिस पथक गेले असता एक महिला गावठी हातभट्टी दारूविक्री करताना मिळून आली. तिच्याकडून १ हजार ८०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. विटाळा येथे अन्य एक महिला ही गावठी हातभट्टी दारूविक्री करताना मिळूनआली. १ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तालुक्यातील जळगाव मंगरुळ येथील मनोज भीमराव गायकवाड यात्याकडून गावठी हातभट्टी दारू किंमत १ हजार ३०० रूपये जप्त करण्यात आली अशा एकूण ५ प्रकरणांमध्ये आरोपीकडून ६०० लीटर मोहामाच सहवा, ८१ लीटर गावठी हातभट्टी दास, १ जुनी वापती मोटरसायकल व दारू गाळण्याचे साहित्य असा एकूण ८९ हजार १०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

# महापालिकेची अतिक्रमण विभागाची दबंग कारवाई

## १ ट्रक साहित्य जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** अमरावती उपायुक्त माधुरी मडावी यांच्या आदेशान्वये अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद याच्या मार्गदर्शनाखाली मालवीय चौक, चौधरी चौक, पंचवटी चौक, चित्राचौक, बापट चौक, प्रभात चौक, टांगा पाहाव, गांधी चौक ते राजकमल रोड, सिटी कोतवाली समोर, रेल्वे स्टेशन चौक, बसस्टँड रोड, सरुक्मिणी नगर येथे साहित्य जप्तीची कारवाई करण्यात आली. १ ट्रक साहित्य जप्तीची आनंद अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली.सदर ठिकाणी रोडच्या




दोन्ही बाजूंनी अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली, तसेच अतिक्रमणधारकांना सूचना देण्यात आल्या वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास दैनंदिन कारवाई सुरू राहणार. सदर कार्यवाहीत अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# पूर्णा मध्यम प्रकल्पाचे दोन दरवाजे गेल्या १४ दिवसांपासून उघडलेलेच



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ चांदुर बाजार** गेल्या सप्ताहापासून चांदूरबाजार तालुक्यात सर्वदूर पाऊस सुरु असल्याने शेतकऱ्यांत सामाधान व्यक्त होत असले तरी काही भागात शेतात पाणी साचल्याने पिकाचे नुकसान झाले आहे. तालुक्यातील विश्रोळी स्थित पूर्णा मध्यम प्रकल्पाचे दोन दरवाजे गेल्या १४ दिवसांपासून उघडलेलेच असल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग सुरूच आहे यात पूर्णत सततधार पाणी वाहत असल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आल्याची माहिती नायब तहसीलदार प्रथमेश मोहोड यांनी दिली.आठ दिवसांपासून चादूरबाजार तालुक्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे. गेल्या चोवीस तासात तालुक्यात २५ मिमी पावसाची नोंद झाली या पावसाने खरीप पिकानी उभारी घेतली आहे. १० दिवसांपासून सुरू असलेल्या या पावसाने अद्याप तालुक्यात सरासरी गाठली नाही. या पावसाने पिकांना उभारी आली असली तरी सोयाबीनवर काही भागात किड व रोगाचे आक्रमण झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.तालुक्यातील पूर्णाधरण स्थळ असलेल्या विश्रोळी येथे पाऊस नसला तरी मध्यप्रदेशातील पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यामुळे यावर्षी धरणाचे दरवाजे गतवर्षीच्या तुलनेत लवकर उघडावे लागले. धरणाची एकूण जलसाठा मर्यादा ४५२ मीटर आहे. या तुलनेत या महिन्यात धरणातील पाण्याचा साठा ४४७.८५ मीटर इतका झाला. या महिन्यात धरणाच्या साठ्याची टक्केवारी ५४.५० इतकी मर्यादित कायम ठेवण्यासाठी धरणाचे दोन दरवाजे गेल्या १० जुलैपासून १० सेंमी इतके उघडले आहेत.

# विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीचा दणका

## तळेगाव ठाकुर मधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये साफसफाईला सुरुवात रुग्णाची गैरसोय झाली दूर





विदर्भ प्रजासत्ताक

तळेगाव ठाकुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा भोंगळ कारभार

डॉ.गैरहजर, रुग्ण आल्या पावली जातात परत, प्रशासनाचे दुर्लक्ष, रुग्णालयाच्या परिसरात झाडे झुडपे तथा तळ्याचे आले स्वरूप, आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

मी शेतकरी आहे शेतात काम करत असता हाताला विळा लागला या आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलो मात्र या ठिकाणी कोणीही नाही आता परत खाजगी डॉ. कडे जात आहो.
विनोद नागदिवे,शेतकरी

मला सकाळ पासून बरे वाटत नाही आहे पोटात दुखत आहे.या आरोग्य केंद्रात आलो पण कोणीच नाही फक्त एक मॅडम आहे ती सांगते डॉ.बाहेर गेले कोणत्यावेळी इथे आलो तर डॉ साहेब दिसतच नाही
ग्रामस्थ सुधीर गडपायले


गावात मलेरियाचे रुग्ण आहे.साथीचे आजारी रुग्ण आहेत.मात्र १२तारखेपासून या ठिकाणी मुख्य डॉ.उपस्थित नाही तर आरोग्य केंद्राच्या बाजूलाच मोठी घाण व पावसाचे डबके साचले आहे या ठिकाणी साफ सफाई सुद्धा होत नाही
महेश लांजेवार ग्रामस्थ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रा मध्ये जो भोंगळ कारभार चालू होता तो लोकप्रिय विदर्भ प्रजासत्ताकने चव्हाट्यावर आणला होता सोबत आरोग्य केंद्राची पावसामुळे झालेली दुर्दशा हि आपल्या लेखणीतून जिल्ह्या प्रशासनापर्यंत पोहचवल्या परिणामी तळेगाव ठाकुर मधील प्राथमिक आरोग्य केंद्रा मध्ये साफसफाईला सुरुवात रुणाची गैरसोय झाली दूर झाली आहे.

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मागील अनेक दिवसांपासून डॉ. उपलब्ध नसायचे त्यामुळे गावातील अनेक रुग्ण उपचारासाठी आल्यानंतर त्यानंतर आल्या पावलीच परत जावे लाग असे त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली होती. वरिष्ठांकडे अनेक वेळा तक्रार करूनही काही उपयोग होते नव्हता याचे सविस्तर वृत्त विदर्भ प्रजासत्ताक ने प्रकाशित केल्यानंतर आरोग्य प्रशासन कुंभकर्णी झोपेतून जागेझाले.प्राथमिक आरोग्य केंद्रा स आरोग्य प्रशासच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली असता ताबोडतोब कामे करण्याचा आदेश दिला लगेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील पावसाळ्याचे पाणी नाली सफा करून काढण्यात सुरवात केली आले.परिसरातील झाडे झुडपे तोडण्याचे काम युद्धपातळीवर चालू झाली .डॉ ची एक टीम या ठिकाणी तेनात करण्यात आली व रुग्णांवर उपचार हि करण्यात आले. या वेळी समस्त तळेगाव ठाकुर मधील नागरिकांनी विदर्भ प्रजासत्ताक न्यूज च्या तालुका प्रतिनिधींचे आभार मानले आहे.

## चिखलदरामध्ये सकाळपासून पावसाची संततधार.. भिमकुंड प्रवाहित.. मनमोहक दृश्य टिपण्यासाठी पर्यटकांची गर्दी..



विदर्भाचे नंदनवन म्हणून चिखलदराची ओळख आहे.. सकाळपासून चिखलदरामध्ये पावसाची संततधार सुरू आहे.. सद्या निसर्गाच्या सौंदर्याने चिखलदरा नटल आहे.. हिरव्यागार वृक्षांनी जणूकाही हिरवी साळी नेसली आहे.. भिमकुंड धबधबा ओसंडून वाहतोय.. भिमकूड मनमोहक दृश्य टिपण्यासाठी पर्यटकांची गर्दी या ठिकाणी झालीय..पावसाची संततधार आणि सर्वत्र पसरलेले धुके,थंडगार वाहणारे वारे यामुळे यामुळे पर्यटकांची गर्दी सद्या चिखलदरा मध्ये होतेय.

## गुरुपौर्णिमेपासून सणांना सुरुवात : यंदा श्रावण महिन्यात पाच सोमवार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

भारतीय सांस्कृतिक क्षणांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. सर्व सण हिंदू पंचांगानुसार होत असल्याने ग्रामीण व कृषी संस्कृती जुळलेली आहे. सणांची सुरुवात गुरुपौर्णिमा या महत्वपूर्ण सणांपासून होत असून रविवारी २१ जुलै रोजी हा सण घराघरात साजरा करण्यात आला. याच दिवशी शिष्य आपल्या गुरूचे पूजन करून आशीर्वाद घेतात. शाळा ते आखाडा, क्रीडा मैदानावर आणि मंदिरात सुद्धा विधिवत पूजा केली जाते. यावेळी पहिला श्रावण सोमवार ५ ऑगस्टला असून नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जयंती आणि पोळा पिठोरी है महत्त्वाचे सण येतात. सणापासून जगण्याचा आनंद मिळतो तो वेगळाच. ऑगस्ट ते सप्टेंबर या महिन्यात पाच सोमवार येतात. भगवान शंकराच्या उपासकांसाठी हा महिना पवित्र मानल्या गेलेला आहे. याच महिन्यात भगवान शंकर आणि पार्वतीची पूजा केली जाते. विविध व्रतवैकल्ये याच महिन्यात केली जाते त्यामले श्रावण सोमवार भगवान शंकराला समर्पित असून त्यांची कृपादृष्टी सदैव राहावी अशी मान्यता आहे. श्रावण महिन्यात ऑगस्टपासून सुरू होणार आहे. पहिला सोमवार ५ ऑगस्ट, दुसरा १२ऑगस्टतिसरा १९ ऑगस्ट, चौथा २६ ऑगस्ट आणि पाचवा तसेच शेवटचा श्रावण सोमवार हा २ सप्टेंबरला आहे. गुरुपौर्णिमेनंतर सणांना सुरुवात होऊ नागपंचमी, मंगळागौरी, स्वातंत्र्य दिन नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, जीवतिव पूजन, श्रीकृष्ण जयंती, गोपाळकाला आणि शेवटच्या श्रावण सोमवारी पोळा हा सण येतो. पोळ्यानंतर पाऊस काही सा कमी होतो, अशी आख्यायिका आहे. श्रावण महिन्यात अनेक भाविक भक्त भगवान शंकराच्या १२ ज्योतिर्लिंग दरशासाठी जात असतात. बरेचदा श्रावण महिन्या चार सोमवार येतात, यावेळी मात्र पाच सोमवार आले हे विशेष. महिन्याती सर्वात सुखद आणि आनंदायी महिन म्हणजे श्रावण,या महिन्यात सणांची रेलचेल असल्याने सर्वांना हवाहवासा वाटतो.खास करून महिला या महिन्याची आतुरतेने वाट पाहतात.

## केवळ मुंबई, पुणे, नागपूर म्हणजेच महाराष्ट्र आहे काय?

### माजी अर्थ राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांचा संतप्त सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी संसदेत वर्ष २०२४ -२५ करिता देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात एका बाजूने विद्यमान सरकारला टेकू दिलेले आंध्र प्रदेश व बिहारवर प्रचंड निधीचा वर्षाव करण्यात आलेला आहे या उलट केंद्रीय करांमध्ये सर्वाधिक वाटा देणाऱ्या महाराष्ट्राच्या तोंडाला सपशेल पाने पुसल्याची चौफेर टीका माध्यमांमध्ये करण्यात आलेली आहे. यावर कोण म्हणतो महाराष्ट्राला काहीच नाही..? असा कोडगा सवाल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना विचारल्याचे वृत्त प्रसारित झालेली आहे. वस्तूतः महाराष्ट्रातील केवळ मुंबई पुणे व नागपूर येथील मेट्रो प्रकल्प, मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट (चणढझ)नागपूर मेट्रो, नागपूर नाग नदी प्रकल्प, पुणे मेट्रो, पुणे मुळा–मुठा संवर्धन प्रकल्प यांना वगळता विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राला कोणतीही आर्थिक तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नाही.यावरून महाराष्ट्र म्हणजे केवळ मुंबई, पुणे आणि नागपूरच आहे काय ..? असा



संतप्त सवाल उपस्थित करून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या तोंडाला सपशेल पाणी पुसल्याचे ताशेरे माजी अर्थ राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी ओढलेले आहे.

विदर्भासाठी सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेला वैनगंगा–पैनगंगा नदीजोड प्रकल्प आता राज्यपालांची मान्यता झालेली असून त्याची अग्रक्रमाने सुरुवात करण्याचे सूतोवाच मागेच देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. या करिता केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये फुटकी कवडी सुद्धा दिली नसल्याचे जळजळीत वास्तव आहे. दर दिवशी शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र राज्य नाव नवा कीर्तिमान स्थापन करीत असल्याच्या पार्श्वूमीवर शेतकरी प्रचंड अडचणीत आहे. अशावेळी सुद्धा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी साधे पॅकेज तर सोडा याबद्दल अवाक्षरही अर्थसंकल्पात नाहीये.

याउलट मुंबई,पुणे, नागपूर येथील मेट्रो, एमयूटीपी, नाग नदी, मुळा– मुठा नदी संवर्धन यासारख्या व इतर तत्सम प्रकल्पांकरिता साधारणतः ५३३१ कोटी रुपये तर या उलट विदर्भ मराठवाडा येथील सिंचन प्रकल्पांसाठी केवळ ६०० कोटींची तरतूद केलेली आहे वस्तूतः विदर्भ मराठवाड्याच्या सिंचनाचा अनुशेष अद्यापही भरून निघालेला नसताना किमान एक रकमी ५००० कोटी रुपये तरतूद यावर करणे अत्यंत गरजेचे होते आणि तसे अपेक्षित सुद्धा होते. परंतु असे करण्याचा कोणताही मानस ना राज्य वा केंद्र सरकार यांचा दिसत नाहीये. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये विदर्भ, मराठवाड्यासह ग्रामीण महाराष्ट्राने भाजपला सपशेल हद्दपार केले याचा सुड केंद्रातील मोदी– शहा जोडी या भागातील नागरिकांवर उगवत आहे काय..? असा संतप्त सवाल सुद्धा या अर्थसंकल्पाच्या तरतुदींच्या निमित्ताने डॉ. सुनील देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

## सर आली धावून, शेकडो एकरातील पिके गेली वाहून : पंचनामे करून नुकसान भरपाई द्या शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

गत आठवडाभरापासून अमरावती जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे नदी, नाले दुथडी भरून वाहात आहेत. पावसामुळे नदी, नाल्याना आलेल्या पुरामध्ये काठावर असलेल्या शेतातील पिके खरडून गेली. चांदुर बाजार, दर्यापूर, तालुक्यातीलयेथील शेकडो हेक्टर क्षेत्रावरील शेतपिकांचे नुकसान झाले असून, अद्याप साधी पाहणी करण्यासाठी



शेताच्या बांधावर कोणी आले नसल्याने शेतकऱ्यांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

यंदा अल्प पावसावर अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. त्यात ओलिताची सोय असणाऱ्या शेतकऱ्यांनी नियोजन केल्याने पीक जोमात आले. तर सुरुवातीला झालेल्या अल्प पावसाचा कोरडवाहू शेतकऱ्यांना फटका बसला. ३० ते ४० टक्के टोबणी निघाल्याने किमान पीक हातात आल्याचे समाधान मानून मोठ्या पावसाची प्रतीक्षा करू लागला. मात्र, निसर्गाने यंदाही घातच केला. गेल्या दोन तीन दिवस झालेल्या पावसाने समाधान व्यक्त झाले. मात्र, एवढ्यावरच न थांबता – पाऊस सतत पडत असल्याने नदी, – नाल्यांना आलेल्या पुरात शेतपीक – खरडून गेली. शेतात पाणी जमा झाल्याने बुरशीजन्य रोगाचाधोका वाढला आहे. झालेल्या नुकसानाची माहिती कृषी विभागाला दिली. मात्र, अद्याप नुकसानाची पाहणी करण्यासाठी कोणताही अधिकारी कर्मचारी बांधावर आला नाही. त्यामुळे शेतकरी संतापलेला आहे.

**शेतपाणंद रस्त्याची झाली दैनावस्था**

पावसामुळे शेतात जाणाऱ्या रस्त्यावर चिखल झाल्याने शेतात रस्त्याची दुरवस्था झाली आहे. गेल्या आठवडाभरापासून शेती कामेही खोळबेल्चाने शेतशिवारात जंगली जनावरांचा हौदोस वाढला असून, शिल्लक पिकात जनावरे ताव मारत असल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. जंगली जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## बच्चू कडू म्हणतात तिसरी आघाडी नाही, तर शेतकरी, शेतमजूर कष्टकरी यांची आघाडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नागपूर**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आमची तिसरी आघाडी नसणार तर शेतकरी शेतमजूर कष्टकरी यांची आघाडी असणार आहे, त्याबाबत चर्चा सुरू आहे. आम्ही महाविकास आघाडी सोबत राहायचे की महायुतीसोबत याबाबतची भूमिका आम्ही ९ ऑगस्ट नंतर स्पष्ट करणार असल्याचे मत आमदार बच्चू कडू यांनी व्यक्त केले.

आमदार बच्चु कडू नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. प्रहारचे नऊ ऑगस्टला संभाजीनगरला महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात आम्ही विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा करणार आहे. कार्यकर्त्यांची मते जाणून घेणार आहे. तिसरी आघाडी म्हणून आम्ही नवीन पक्ष सुरू करणार नाही तर शेतकरी शेतमजूर आणि कष्टकरी यांना सोबत घेऊन आम्ही आघाडी करणार आहे. संभाजीनगरच्या महामोर्चानंतर आमची राजकीय भूमिका स्पष्ट होईल



मात्र तो पर्यंत वाट पहा असेही बच्चु कडू म्हणाले.रविकांत तुपकर आता शेतकऱ्यांना सोबत घेऊन काम करणार आहे आम्ही सुद्धा दिव्यांग आणि शेतकऱ्यांसाठी काम करतो आहे. राजू शेट्टी यांच्यासोबत या संदर्भात काही संवाद झाला नाही मात्र राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांच्याशी समन्वय साधून याबाबत चर्चा करण्यात येईल. शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या नेत्यांनी सर्वांनी एकत्र असा आमचा विचार आहे. राजू शेट्टी यांनी रविकांत तुपकर यांच्यावर कारवाई केली हा त्यांचा वैयक्तिक विषय आहे आणि त्यावर आम्ही बोलणार नाही मात्र शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या सर्व नेत्यांनी आणि पक्षांनी एकत्र यावे अशी आमची भूमिका आहे त्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहे मात्र आम्ही ९ ऑगस्टनंतर त्याबाबतची भूमिका स्पष्ट करणार असल्याचे बच्चु कडू म्हणाले.राज्य सरकारकडे निधी नाही. आमदारांना विकासासाठी पैसा उपलब्ध नसेल तर अजित पवार तरी कसे देतील. अल्पसंख्याकांना अजुनही एक खडकू दिला नाही. मुस्लिम समाजासाठी वापरणाऱ्या निधीला अर्थसंकल्पात एक रुपयाची तरतूद करण्यात आली नसल्याचे बच्चु कडू म्हणाले.

## मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष नितीन पाटील यांच्या अमरावती जिल्हा दौरा

### मानवी हक्क संदर्भातील प्रकरणावर होणार सुनावणी : नागरिकांने लाभ घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष व सचिव हे उद्या शुक्रवार, दि. २६ ते २८ जुलै २०२४ या कालावधीत अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यासाठी येत आहे. त्यांच्या दौरा कालावधीत मानवी हक्क आयोगातील प्रकरणावर सुनावणी घेण्यासाठी शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

पाटील यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे : शुक्रवार दि. २६ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १०.३० पासून विविध तक्रारींबाबत सुनावणी होणार आहे. त्याचप्रमाणे ज्या तक्रारदारांना मानवी हक्कांच्या संदर्भात काही मुद्दे मांडायचे असतील तर सकाळी १०.३० ते दुपारी २ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात व संध्याकाळी ५ से ६ या वेळेत सर्किट हाऊस, विश्रामगृह, अमरावती येथे आपली तक्रार देऊ शकतात.

शनिवार दि. २७ जुलै २०२४ रोजी अमरावती विद्यापीठात सकाळी ११ वाजता डॉ. श्रीकांत जिचकर मेमोरिअल रिसर्च सेंटर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे युवा रुरल असोसिएशन, नागपूर या स्वयंसेवी संघटनेच्या मदतीने वीरपत्नी शेतकरी महिलांच्या प्रश्नांबाबत व त्यांच्या हक्कांबाबत चर्चासत्राचे आयोजन. ज्या संघटनांना या चर्चासत्रात सहभागी व्हायचे असेल ते या सत्रात सहभागी होऊ शकतील. रविवार दि. २८ जुलै २०२४ रोजी विश्रामगृह अमरावती येथे काही तक्रारदारांना त्यांचे म्हणणे व तक्रार दाखल करावयाचे असल्यास त्यांनी दुपारी १ ते १.३० या दरम्यान राखीव ठेवण्यात आले आहे.

दौऱ्यादरम्यान मानवी हक्क आयोग विविध संस्थांना भेटी देणार आहे. तसेच आदिवासी भागामध्ये शासनाच्या योजना थेट लोकांपर्यंत पोहोचाव्या यासाठी आधारकार्ड, रेशकार्ड व जातीचा दाखला या विषयांवरही जिल्हा प्रशासनासोबत चर्चा केली जाणार आहे. स्वयंसेवी संघटनांना याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी आहे, त्यांनी याचा लाभ घ्यावा. शासनाच्या बऱ्याच योजनांचे लाभ हे आधारशी जोडले गेल्यामुळे व आधारकार्ड नसलेली बरीच प्रकरणे निदर्शनास येत आहे. हा विषय प्रामुख्याने चर्चा करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्तही अमरावती जिल्ह्याचे काही महत्त्वाचे प्रश्न, मानवी हक्कांसंदर्भातील प्रश्न मांडण्यासाठी मानवी हक्क आयोग तीन दिवस अमरावतीमध्ये उपलब्ध असून नागरिकांने त्याचा लाभ घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.